रविवार दि. ०४ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भव्य दुर्गामूर्तींना अंतिम साज; जालन्यात नवरात्रोत्सवाची लगबग

### विविध कारखान्यांमध्ये मूर्तीनिर्मिती अंतिम टप्प्यात; ६ ते २० फुटांपर्यंतच्या मूर्तींना मोठी मागणी

**जालना - प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना जालना शहरात नवरात्रोत्सवाची लगबग सुरू झाली आहे. शहरातील प्रसिद्ध संत्रे बंधू आर्ट्सर्ससह विविध मूर्तिकारांच्या कारखान्यांमध्ये भव्य-दिव्य दुर्गामातेच्या मूर्ती घडविण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून, कारागिरांच्या कुशल हातांनी साकारलेल्या मूर्तींना आता रंग, अलंकार आणि आकर्षक सजावटीचा अंतिम साज चढविला जात आहे. देवीच्या मूर्तींचे देखणे रूप, आकर्षक नेत्रसजावट, विविध अलंकार आणि भव्य आकार भाविकांचे लक्ष वेधून घेत आहेत. यंदा लहान आकाराच्या मूर्तींसोबतच ६, ८, १०, १५, १८ आणि तब्बल २० फूट उंचीच्या दुर्गामातेच्या मूर्ती तयार करण्यात येत आहेत. विशेषतः मोठ्या आकाराच्या मूर्ती साकारण्यात जालना शहरातील संत्रे बंधू आर्ट्सची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. त्याचबरोबर देऊळगाव राजा रोडवरील गुलाब पठाण यांच्या कारखान्यातही विविध आकारांच्या देवीच्या मूर्ती घडविण्याचे काम सुरू आहे.

दुर्गामातेची मूर्ती घडविणे ही केवळ व्यावसायिक प्रक्रिया नसून त्यामागे कारागिरांचे कौशल्य, कल्पकता, मेहनत आणि कलात्मक दृष्टी असते. मूर्तीचा सांगाडा तयार करण्यापासून मातीचा थर देणे, चेहऱ्याचे बारकावे घडविणे, हात-पायांची ठेवण, मुकुट, वस्त्रालंकार, आयुधे, सिंहाची रचना, रंगकाम आणि अंतिम सजावट अशा अनेक टप्प्यांतून देवीची मूर्ती आकाराला येते.

विशेषतः मोठ्या उंचीच्या मूर्ती तयार करताना आकारमानानुसार मजबुती, प्रमाणबद्धता आणि वाहतूक तसेच प्रतिष्ठापनेसाठी आवश्यक बाबींचाही विचार करावा लागतो. त्यामुळे कारागिरांना प्रत्येक मूर्तीवर विशेष मेहनत घ्यावी लागते. अनेक दिवसांच्या अथक परिश्रमानंतर देवीचे आकर्षक रूप भाविकांसमोर येते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही जालना जिल्ह्यासह परजिल्ह्यातील विविध दुर्गा उत्सव मंडळांकडून जालना येथील मूर्तिकारांकडे मूर्तींची मागणी असल्याचे दिसून येत आहे. अनेक मंडळांनी आपल्या आवडीनुसार मूर्तींची नोंदणी यापूर्वीच केली असून, काही मूर्तींचे काम पूर्णत्वास आले आहे. नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी या मूर्ती संबंधित मंडळांच्या मंडपात विराजमान होणार आहेत.

मोठ्या आकाराच्या मूर्तींना विशेष मागणी असल्याने कारखान्यांमध्ये सध्या दिवस-रात्र कामाची लगबग पाहायला मिळत आहे. अंतिम रंगकाम, अलंकारांची जडणघडण आणि मूर्तीला आकर्षक रूप देण्याचे काम वेगाने सुरू आहे.



भारतीय संस्कृतीमध्ये नवरात्रोत्सवाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. 'नवरात्र' म्हणजे देवीच्या शक्तीच्या विविध रूपांची नऊ दिवस भक्तिभावाने उपासना करण्याचा उत्सव. शारदीय नवरात्र हा विशेषतः देशभरात मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. दुर्गामाता ही शक्ती, सामर्थ्य, धैर्य आणि अधर्माविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक मानली जाते. पौराणिक परंपरेनुसार, महिषासुराचा वध करण्यासाठी विविध देवतांच्या शक्तींच्या एकत्रित रूपातून आदिशक्ती दुर्गेचा आविष्कार झाला. त्यामुळे नवरात्रातील देवीची उपासना ही वाईटावर चांगल्याचा, अधर्मावर धर्माचा आणि अंधारावर प्रकाशाचा विजय याचे प्रतीक मानली जाते. नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कूष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री या नवदुर्गांच्या रूपांना धार्मिक परंपरेत विशेष महत्त्व आहे. प्रत्येक रूपातून शक्ती, तपस्या, ज्ञान, करुणा, धैर्य आणि विजय यांचे प्रतीकात्मक दर्शन घडते.

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित राहिलेला नाही. काळानुसार त्याला सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपही प्राप्त झाले आहे. शहरातील विविध मंडळांकडून देवीची प्रतिष्ठापना, आरती, भजन, गरबा, दांडिया, सांस्कृतिक कार्यक्रम, महिला व बालकांसाठी विविध उपक्रम तसेच सामाजिक जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येतात. त्यामुळे सामाजिक एकोपा, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्यासही या उत्सवातून हातभार लागतो. नवरात्रोत्सवात आदिशक्तीची पूजा होत असल्याने महिला शक्तीचा सन्मान आणि स्त्रीच्या सामर्थ्याचा संदेशही या उत्सवातून अधोरेखित होतो. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान, महिलांसाठी विविध उपक्रम आणि मुलींच्या शिक्षणाबाबत जनजागृती अशा उपक्रमांनाही नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून चालना मिळत आहे.

जालना शहरात गणेशमूर्तींसोबतच दुर्गामातेच्या भव्य मूर्ती घडविण्याची परंपराही विकसित झाली आहे. विविध आकार, आकर्षक रंगसंगती, पारंपरिक अलंकार आणि आधुनिक कलात्मक संकल्पनांचा वापर करून कारागीर देवीच्या मूर्ती साकारत आहेत. जिल्ह्याबाहेरील मंडळांकडूनही मूर्तींना मागणी होत असल्याने जालन्याच्या मूर्तीकलेला व्यापक बाजारपेठ मिळत आहे. या माध्यमातून स्थानिक कारागिरांना रोजगार आणि त्यांच्या पारंपरिक कलेला व्यासपीठ मिळत आहे. एका मूर्तीमागे मूर्तिकारांसह रंगकाम, अलंकारनिर्मिती, वाहतूक आणि सजावट करणाऱ्या अनेक हातांचे योगदान असते.

नवरात्रोत्सवाची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतशी कारखान्यांमधील लगबग वाढली आहे. तयार झालेल्या मूर्तींचे रंगकाम, अलंकारांची जोडणी आणि अंतिम स्वरूप *(पान २ वर)*

## लुटमार करणाऱ्या सहा जणांच्या आंतरजिल्हा टोळीला २४ तासांत जेरबंद

### चाकूचा धाक दाखवून १२ हजार रुपये लुटल्याचा आरोप, संपूर्ण रक्कम हस्तगत

**भोकरदन - प्रतिनिधी**

दुष्काळ पाहणी कार्यक्रमावरून मोटारसायकलने घरी परतणाऱ्या व्यक्तीला रस्त्यात अडवून चाकूचा धाक दाखवत त्याच्याकडील १२ हजार रुपये बळजबरीने लुटल्याच्या प्रकरणाचा भोकरदन पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावला. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी सहा जणांच्या आंतरजिल्हा गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत पाच संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. लुटलेली १२ हजार रुपयांची संपूर्ण रोकडही पोलिसांनी हस्तगत केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन कडबा वाघमारे (वय ४४, रा. मलकापूर, ता. भोकरदन) हे २ ऑक्टोबर रोजी दगडवाडी येथे दुष्काळ पाहणी कार्यक्रम पाहून आपल्या मोटारसायकलवरून घरी परतत होते. यावेळी एका पांढऱ्या रंगाच्या एरिटा कारमधून आलेल्या सहा जणांनी त्यांची वाट अडवली. आरोपींनी वाघमारे यांची गचांडी धरून त्यांना धमकावले. तसेच चाकूचा धाक दाखवत त्यांच्या पॅन्टच्या खिशातील १२ हजार रुपये बळजबरीने काढून घेतले आणि कारमधून घटनास्थळावरून पलायन केले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली.

या घटनेनंतर गजानन वाघमारे यांच्या फिर्यादीवरून भोकरदन पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५३२/२०२६ *(पान २ वर)*

## कदीम जालन्यातील दोन घरफोड्यांचा छडा; सराईत आरोपी जेरबंद

### बंद घरांचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने लंपास; १३ ग्रॅम सोने, २ लाख २० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**जालना । प्रतिनिधी**

कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंद घरांचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या एका सराईत आरोपीला पोलिसांनी जेरबंद केले आहे. पोलिसांनी केलेल्या तपासात घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आले असून, दोन्ही गुन्ह्यांतील चोरीस गेलेले एकूण १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, अंदाजे २ लाख २० हजार रुपये किमतीचे, आरोपीकडून हस्तगत करण्यात आले आहेत. आरोपीकडे इतर



गुन्ह्यांच्या अनुषंगानेही तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत १८ ऑगस्ट २०२६ रोजी जुना जालना परिसरातील प्रज्ञा बुद्ध विहाराजवळ घरफोडीची घटना घडली होती. फिर्यादीचे घर बंद असल्याची संधी साधून आरोपीने घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील ९ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत चोरून नेली होती. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५२/२०२६, भारतीय न्याय संहितेतील कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर १८ सप्टेंबर २०२६ रोजी ऋषीपार्क, संजीवनी हॉस्पिटल परिसर, जुना जालना येथेही बंद घराला लक्ष्य करण्यात आले. आरोपीने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरून नेली. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५५५/२०२६, कलम ३०५(अ), भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सलग घडलेल्या घरफोड्यांच्या पार्श्वभूमीवर या गुन्ह्यांचा तपास गांभीर्याने घेण्यात आला. पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी कदीम जालना पोलीस *(पान २ वर)*

## जालना-जायकवाडी पाणीपुरवठा योजनेच्या आवश्यक तांत्रिक कामांसाठी दिनांक ५ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत पाणीपुरवठा राहणार बंद

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, जालना शहर महानगरपालिकेमार्फत जालना-जायकवाडी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पैठण व अंबड येथील पंपिंग स्टेशनमधील जुने पंप काढून त्याऐवजी नवीन पंप बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. सदर काम सुरक्षितरित्या व तांत्रिकदृष्ट्या योग्य पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित पंपिंग स्टेशनचा शटडाऊन घेणे आवश्यक आहे. तसेच, नवीन ३५ जलशुद्धीकरण केंद्रातून येणारी ९०० मि.मी. व्यासाची शुद्ध पाण्याची वाहिनी जुन्या पंपिंग स्टेशनच्या ९०० मि.मी. व्यासाच्या विद्यमान पाणीपुरवठा वाहिनीला जोडण्याचे कामही करण्यात येणार आहे. या कामासाठी संबंधित पाणीपुरवठा वाहिनीचा शटडाऊन घेणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कामे एकाच कालावधीत पूर्ण करून पाणीपुरवठा यंत्रणा लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने दिनांक ०५/१०/२०२६ ते दिनांक ०७/१०/२०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत सलग शटडाऊन घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. *(पान २ वर)*

## कृत्रिम बुद्धिमत्ता हे आव्हान नसून कौशल्याच्या विकासाचे प्रभावी साधन- सुनील रायठठ्ठा

### क्रेडाई जालनातर्फे अभियंता दिनानिमित्त विशेष चर्चासत्र; शहरातील अभियंत्यांचा गौरव

**जालना - प्रतिनिधी**

एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेकडे आव्हान म्हणून न पाहता सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास, बांधकाम व्यवसायासाठी ते एक अत्यंत प्रभावी साधन (टूल्स) ठरू शकते. अभियंता आपल्या ज्ञान, कौशल्य आणि अनुभवाच्या जोरावर या तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसाय अधिक समृद्ध करू शकतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक सुनीलभाई रायठठ्ठा यांनी केले.




क्रेडाई जालनाच्यावतीने अभियंता दिनानिमित्त येथील हॉटेल अतिथी येथे बांधकाम व्यावसायिक व अभियंत्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व भविष्यातील अभियंत्यांसमोरील आव्हाने या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

पुढे बोलताना सुनीलभाई रायठठ्ठा म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आज एका क्लिकवर सर्वसामान्यांना अथांग माहिती उपलब्ध होत आहे. विशेषतः तरुण झेन-झी पिढी हे नवनवीन तंत्रज्ञान अत्यंत वेगाने आत्मसात करत आहे. बदलत्या कुटुंबव्यवस्थेत घरांची किंवा अंतर्गत वस्तूंची खरेदी *(पान २ वर)*

## दिवाणी वादांना गुन्हेगारीचे स्वरूप देण्याचा पोलिसांचा खटाटोप?

### सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला देत जालन्यात अॅड. महेश धन्नावत यांचा इशारा

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर व जिल्ह्यात शुद्ध दिवाणी स्वरूपाच्या मालमत्ता तसेच आर्थिक व्यवहारांच्या वादांना जाणीवपूर्वक गुन्हेगारी रंग देण्याचे प्रकार वाढीस लागले असून, कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्या घटकांशी हातमिळवणी करून पोलीस यंत्रणा दबाव निर्माण करत असल्याचा आरोप कायदेतज्ज्ञ अॅड. महेश धन्नावत यांनी केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण न्यायनिर्णयाचा दाखला देत त्यांनी या गैरप्रकारावर तीव्र आक्षेप नोंदवला असून अशा कारवायांविरोधात न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने नुकताच अनुकूल सिंह वि. उत्तर प्रदेश राज्य (फौजदारी अपील क्र. ४२५०/२०२५) या प्रकरणात निकाल दिला आहे. *(पान २ वर)*

## अन्न सुरक्षा प्रशिक्षण शिबिरात ४९ कॅटरिंग व्यावसायिकांचा सहभाग

### नियम हे त्रास देण्यासाठी नव्हे तर सुरक्षेसाठी असतात-निखिल कुलकर्णी

**जालना - प्रतिनिधी**

कॅटरिंग व्यवसायात अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि सुरक्षित अन्न हाताळणीच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने जालना केटरर्स असोसिएशनच्यावतीने शनिवार दि. ३ सप्टेंबर रोजी येथील मधुर बँक्वेट हॉलमध्ये अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या नियमांनुसार पार पडलेल्या अन्न सुरक्षा प्रशिक्षण व प्रमाणीकरण या



विशेष शिबिरात शहरातील ४९ कॅटरिंग व्यावसायिकांनी सहभाग नोंदविला.

राज्यात तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अन्न सुरक्षेबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर जालना केटरर्स असोसिएशनच्यावतीने मार्गदर्शन आणि प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष शिबिराचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त निखिल कुलकर्णी यांच्याहस्ते आणि अन्न सुरक्षा अधिकारी अश्विनी तांबे, विनोद ओसावार, अधिकृत अन्नसुरक्षा प्रशिक्षक डॉ. रामेश्वर जाजू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी उपस्थित कॅटरर्सना संबोधित करताना अन्न *(पान २ वर)*

## सेवा संकल्प अभियान : वन्यजीव सप्ताहात जनजागृती, वृक्षारोपण व स्वच्छता मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना - प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानांतर्गत वन्यजीव सप्ताहाच्या कालावधीत जालना वन विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मानव-वन्यजीव संघर्ष, वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि हवामान बदल याबाबत नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम राबवून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.




वनपरिक्षेत्र जालना दक्षिण कार्यालयाच्या वतीने मौजे जामखेड, ता. अंबड येथील जांबुवंत मंदिर परिसरात मानव-वन्यजीव संघर्षाबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी वन्यप्राण्यांपासून सुरक्षित अंतर राखणे, वन्यप्राण्यांचा अधिवास सुरक्षित ठेवणे, वन्यजीवांशी संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी *(पान २ वर)*

# संपादकीय...

## संकटात शेतकऱ्यांना दिलासा हवा; आश्वासनांपलीकडे मदतीची गरज

जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बदनापूर तालुक्यातील वरुडी आणि भोकरदन तालुक्यातील दगडवाडी शिवाराला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. पिकांची अवस्था प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणे आणि शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेणे ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. ''शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही'', ''शासन सर्वोतोपरी मदत करेल'', ''नुकसानग्रस्तांना अधिकाधिक मदत मिळावी'' अशी ग्वाही महसूलमंत्र्यांनी दिली आहे. मात्र दुष्काळाच्या काळात शेतकऱ्याला केवळ आश्वासनांची नव्हे, तर वेळेत आणि पुरेशी आर्थिक मदत मिळण्याची गरज असते. त्यामुळे मंत्र्यांच्या दौऱ्यानंतर आता खरा प्रश्न सुरू होतोपंचनामे किती वेगाने होणार? नुकसान किती अचूक नोंदवले जाणार? पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत कधी जमा होणार? आणि शासनाच्या घोषणेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यापर्यंत पोहोचणार कसा? जालना जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात कमी पाऊस आणि पावसाच्या प्रदीर्घ खंडाचा मोठा परिणाम झाला आहे. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, तूर यांसारख्या पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. शेतकऱ्याने बियाणे, खत, औषधे, मशागत आणि मजुरीवर खर्च केला; मात्र निसर्गाने साथ न दिल्याने त्या खर्चाची परतफेड करण्याचीही परिस्थिती उरलेली नाही.

यात एक मूलभूत विसंगती आहे. शेतकऱ्याचे नुकसान मात्र प्रत्यक्ष असते; शासनाची मदत मात्र प्रक्रियेतून येते. ही प्रक्रिया जितकी लांबेल तितका संकटाचा भार वाढत जातो. म्हणून पंचनामे केवळ कागदावरील औपचारिकता न राहता प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीचे प्रतिबिंब ठरले पाहिजेत. महसूल, कृषी आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नुकसानग्रस्त प्रत्येक पात्र शेतकऱ्याची वस्तुनिष्ठ नोंद करणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत पंचनामा हा केवळ प्रशासकीय अहवाल नसतो. तो शेतकऱ्याला मिळणाऱ्या मदतीचा आधार असतो. त्यामुळे या प्रक्रियेत विलंब, तांत्रिक अडथळे किंवा नोंदीतील त्रुटी यामुळे पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये. विशेषतः ज्या भागात ई-पीक पाहणी, सातबारा, गावनकाशा किंवा पीक नोंदींशी संबंधित अडचणी आहेत, त्या ठिकाणी प्रशासनाने प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या अडचणी समजून घेणे गरजेचे आहे. कागदावरील नोंद आणि शेतातील वास्तव यात विसंगती असेल तर नुकसानग्रस्त शेतकऱ्याने त्याची किंमत का मोजावी? राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असल्याचे महसूलमंत्र्यांनी सांगितले आहे. शासनाने दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देशही दिले आहेत. मात्र शेतकऱ्याच्या दृष्टीने दुष्काळाची खरी कसोटी सरकारी आदेशात नाही, तर त्याच्या बँक खात्यात, शेतातील पिकाच्या नुकसानीच्या भरपाईत आणि पुढील हंगाम उभा करण्याच्या क्षमतेत आहे. सरकारने ''अधिकाधिक मदत'' देण्याचे आश्वासन दिले आहे. या शब्दाला आता ठोस आर्थिक अर्थ मिळणे अपेक्षित आहे. नुकसानाचे प्रमाण, प्रत्यक्ष उत्पादनातील घट, शेतकऱ्याचा झालेला खर्च आणि उपलब्ध शासकीय निकष यांचा विचार करून मदतीची प्रक्रिया पारदर्शक आणि वेळबद्ध असली पाहिजे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शासनाकडून मिळणारी मदत हा एक भाग आहे; तर पीकविमा हा दुसरा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत पीकविमा दाव्यांची प्रक्रिया, नुकसानीचे मूल्यांकन आणि पात्र शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई याकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला प्रत्येक वेळी नव्याने कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत. एकाच नुकसानीसाठी अनेक कागदपत्रे, अनेक कार्यालये आणि अनेक प्रतीक्षा यंत्रणा उभ्या राहिल्या तर 'मदत' ही संकल्पनाच निरर्थक ठरते. मंत्र्यांनी शेतात जाऊन पीक पाहणी केली, शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. आता या दौऱ्याचे मूल्यमापन छायाचित्रांवर होणार नाही; ते पंचनामे पूर्ण होण्याच्या वेगावर आणि शेतकऱ्यांच्या खात्यावर पोहोचणाऱ्या मदतीवर होईल. दुष्काळाच्या काळात राजकीय श्रेयापेक्षा प्रशासकीय परिणाम महत्त्वाचा असतो. कोणत्या नेत्याने किती दौरे केले यापेक्षा किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळाली, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने या टप्प्यावर चार बाबींना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

एक  नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे वेगाने आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने पूर्ण करणे. दोन  पात्र शेतकऱ्यांना मदत देताना तांत्रिक किंवा कागदोपत्री त्रुटींमुळे त्यांचे नुकसान होऊ न देणे. तीन  पीकविमा आणि शासन मदत यांची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी पारदर्शक व सुलभ करणे. चार  जाहीर केलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा तालुकानिहाय आढावा घेऊन त्याची माहिती सार्वजनिक करणे.  दुष्काळ हा केवळ पावसाचा प्रश्न नाही; तो शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा, कर्जफेडीचा, पुढील हंगामाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यावरची उपाययोजनाही तितकीच व्यापक असायला हवी. महसूलमंत्र्यांनी दिलेली ''शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही'' ही ग्वाही आश्वासक आहे. आता या ग्वाहीची खरी परीक्षा पंचनाम्याच्या कागदापासून शेतकऱ्याच्या बँक खात्यापर्यंत होणार आहे. शेतकऱ्याला आश्वासन नको असे नाही; पण आश्वासनानंतरची कृती त्याहून महत्त्वाची आहे. दुष्काळाच्या झळा प्रत्यक्ष शेतात आहेतत्यामुळे मदतीची सावलीही प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहोचली पाहिजे.

# पदापेक्षा माणुसकी मोठी; मोठे पद मिळवतानाच मोठे मन जपा – भास्कर अंबेकर

**जालना – प्रतिनिधी**



'माणसाची खरी ओळख त्याच्या पदात, प्रतिष्ठेत किंवा बाह्य दिखाव्यात नसते; ती त्याच्या विचारांत, संस्कारांत आणि माणुसकीत असते. विद्यार्थ्यांनी मोठे पद मिळवण्याचे स्वप्न जरूर पाहावे; मात्र त्या पदासोबत मोठे मन, नम्रता, संस्कार आणि माणुसकी जपण्याचेही स्वप्न पाहावे,'' असे प्रतिपादन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केले.१०० शिक्षक समुह जालना तर्फे महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धा-२०२६ चा बक्षीस वितरण समारंभ शुक्रवार (दि.०२) रोजी शांतिनिकेतन विद्यामंदिर, जालना येथे पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी भास्करराव अंबेकर यांनी गहिऱ्या नद्यांचे पात्र, सावली देणारी झाडे आणि खऱ्या मोत्यांचे उदाहरण देणाऱ्या शायरीचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना जीवनाचा संदेश दिला. जिल्हाधिकारी, डॉक्टर, नेता किंवा अधिकारी होणे मोठी जबाबदारी आहे; मात्र पदाचा अभिमान माणुसकीपेक्षा मोठा होऊ नये. पद आज आहे, उद्या नसेल; माणुसकीतून निर्माण झालेली ओळख मात्र कायम राहते, असे त्यांनी सांगितले.उपशिक्षणाधिकारी रवी जोशी यांनी महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्याचे शासनाचे निर्देश असून, १०० शिक्षक समुहाने या निर्देशाला विद्यार्थिकेंद्री वक्तृत्व स्पर्धेची जोड दिल्याचे सांगितले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, विचारशक्ती व प्रभावीपणे विचार मांडण्याची क्षमता विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.समूहाचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांनी प्रास्ताविकात समूहाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वकला व आत्मविश्वास निर्माण करणे, महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर करणे आणि त्यांच्या द्विशताब्दीचा गौरव करणे हा स्पर्धेचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.या स्पर्धेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे मराठीसोबत उर्दू भाषिक विद्यार्थ्यांसाठीही वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. उर्दू विद्यार्थ्यांसाठी अशा स्वरूपाची स्पर्धा जालना जिल्ह्यात बहुधा प्रथमच होत असावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली. डॉ. प्रदीप हुशे यांनी वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळते, तर अनुजा राऊत यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

स्पर्धेसाठी डॉ. बाबासाहेब खंडाळे, डॉ. चंद्रकांत धोत्रे, नारायण राजेभोसले, भारत साळवे, विलास जमधडे, रामेश्वर धोपटे तसेच उर्दू विभागासाठी नजमोद्दीन सर व तालिब कुरेशी सर यांनी तज्ज्ञ परीक्षक म्हणून काम पाहिले.विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व महात्मा फुले यांचे पुस्तक देऊन गौरविण्यात आले.

# पान १ वरुन...

## भव्य दुर्गामूर्तींना...

देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मूर्ती वेळेत मंडळांपर्यंत पोहोचविण्यासाठी कारागीर आणि संबंधित मंडळांचे पदाधिकारीही नियोजन करीत आहेत. देवीची मूर्ती तयार झाल्यानंतर ती मंडपात विराजमान करण्याचा क्षण मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी आणि भाविकांसाठी भावनिक असतो. त्यामुळे मूर्तीच्या प्रत्येक बारकाव्याकडे विशेष लक्ष दिले जाते. जालन्यात तयार होत असलेल्या या भव्य दुर्गामूर्तींकडे पाहताना 'भव्यतेतून भक्तीचा आविष्कार आणि कलेतून देवीच्या शक्तीचे दर्शन' अशी भावना व्यक्त होत आहे. एका बाजूला श्रद्धेने देवीची आराधना करण्याची तयारी सुरू असताना दुसऱ्या बाजूला कारागिरांच्या कलाकौशल्यातून देवीचे भव्य स्वरूप आकार घेत आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालन्यातील मूर्तिकारांच्या कारखान्यांमध्ये सुरू असलेली ही लगबग शहरातील धार्मिक वातावरणाला एक वेगळेच सौंदर्य देत आहे. आगामी नऊ दिवस भक्ती, शक्ती, संस्कृती आणि उत्साहाने भारलेले असणार असून, विविध मंडळांमध्ये विराजमान होणाऱ्या भव्य दुर्गामूर्ती हा यंदाच्या नवरात्रोत्सवाचा प्रमुख आकर्षणबिंदू ठरणार आहे.

## लुटमार करणाऱ्या...

दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहितेतील कलम ३१०(२), ११५(२), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटना गंभीर स्वरूपाची असल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी तपासाला तातडीने गती दिली. आरोपींचा माग काढण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने तपास सुरू केला. घटनास्थळाची माहिती, उपलब्ध तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढला. तपासादरम्यान या लुटमारीच्या प्रकरणात परभणी आणि जालना जिल्ह्यातील व्यक्तींचा सहभाग असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले.

त्यानंतर पोलिसांनी कारवाई करत खालील संशयितांना ताब्यात घेतले. रवि मारोती शिंदे (वय २१), रा. बलसा खुर्द, ता. जि. परभणी , दत्तु प्रभाकर धोत्रे (वय २०), रा. बलसा खुर्द, ता. जि. परभणी, कृष्णा रामचंद्र पारधे (वय २५), रा. पिपळी, ता. जि. परभणी, राहुल रमेश जाधव (वय १९), रा. खानापूर फाटा, ता. जि. परभणी, सचिन उर्फ राम शिवाजी शिंदे (वय १९), रा. विरेगाव तांडा, ता. जि. जालना, एक विधीसंघर्षग्रस्त बालक अल्पवयीन असल्याने संबंधित बालकाची ओळख कायद्यानुसार जाहीर करण्यात आलेली नाही.

लुटमारीत फिर्यादीकडून बळजबरीने घेण्यात आलेली १२ हजार रुपयांची संपूर्ण रोकड पोलिसांनी हस्तगत केली आहे. त्यामुळे गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल पूर्णपणे परत मिळवण्यात पोलिसांना यश आले आहे.

या टोळीने अशाच प्रकारच्या आणखी काही गुन्ह्यांना अंजाम दिला आहे का, याबाबत पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे. आरोपींच्या पूर्वीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची तसेच त्यांच्या इतर साथीदारांचीही माहिती तपासली जात असल्याची शक्यता आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भोकरदन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके, पोलीस अंमलदार प्रशांत उबाळे, लक्ष्मण रानगोते, संदीप भुतेकर, गणेश पिंपळकर, अर्जुन टेकाळे आणि संतोष बनकर यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### २४ तासांत गुन्ह्याचा छडा

रस्त्यात अडवून चाकूचा धाक दाखवत करण्यात आलेल्या लुटमारीनंतर अवघ्या २४ तासांत आरोपी निष्पन्न करून त्यांना पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आले. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईमुळे गुन्ह्याचा वेगाने तपास लागला असून, प्रकरणातील पुढील तपास भोकरदन पोलीस करीत आहेत.

## कदीम जालन्यातील...

ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांना गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार पोलीस निरीक्षक शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलिसांच्या तपास पथकाने घरफोडीच्या दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू केला. उपलब्ध माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करत पोलिसांनी एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीची चौकशी केली असता कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरील दोन्ही घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास पुढे आला. आरोपीचे नाव हरीओम संतोष करडकर (वय २४, रा. म्हाडा कॉलनी, पाच अंबादेवी, जुना जालना) असे आहे. पोलिसांनी आरोपीकडून दोन्ही गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला. यामध्ये ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण आणि ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी यांचा समावेश आहे. या दोन्ही दागिन्यांचे एकूण वजन १३ ग्रॅम असून, त्यांची किंमत सुमारे २ लाख २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. आरोपीकडून कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असले तरी, त्याचा इतर गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे का, याचीही पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. त्यामुळे या तपासातून आणखी काही घरफोड्यांची उकल होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

उघडकीस आलेले गुन्हे : १) कदीम जालना पोलीस ठाणे गु.र.नं. ५५५/२०२६, कलम ३०५(अ) भा.न्या.सं., दि. १८ सप्टेंबर २०२६. २) कदीम जालना पोलीस ठाणे गु.र.नं. ४५२/२०२६, कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं., दि. १८ ऑगस्ट २०२६.

जप्त मुद्देमाल : ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण, ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, एकूण १३ ग्रॅम सोन्याचे दागिने, अंदाजे किंमत : २ लाख २० हजार रुपये ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत पोहेकॉ सदा राठोड, सचिन चौधरी, धनाजी कावळे, पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख, इम्रान खान, संदीप चव्हाण आणि दिलीप गायकवाड यांनी सहभाग घेतला. कदीम जालना पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे बंद घरांना लक्ष्य करणाऱ्या घरफोडीच्या दोन घटनांचा छडा लागला असून, चोरीस गेलेला सोन्याचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

## जालना-जायकवाडी...

त्यामुळे सदर कालावधीत जालना-जायकवाडी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जालना शहराचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे. परिणामी, नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल महानगरपालिका प्रशासन दिलगीर आहे.

तरी जालना शहरातील सर्व नागरिकांनी सदर शटडाऊन कालावधी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा, पाण्याचा वापर काटकसरीने करावा तसेच पाण्याचा अपव्यय टाळून महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता...

करताना अंतिम निर्णय हीच तरुण पिढी घेणार आहे. त्यामुळे भविष्यात बांधकाम करताना या पिढीच्या आवडीनिवडी व गरजा लक्षात घेऊन घरांचे डिझाइन तयार करावे लागेल. वेगाने होणाऱ्या तंत्रज्ञान क्रांतीमध्ये स्वतःचे ज्ञान अपडेट आणि अपग्रेड करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक उपयुक्त साधन ठरेल. क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी आपल्या मनोगतात बदलत्या काळानुसार बदलण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर बांधकाम क्षेत्रात अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञान येत आहे. कमीत कमी वेळेत दर्जेदार इमारती उभारण्यासाठी एआय उपयुक्त ठरेल. महाराष्ट्रात रिअल इस्टेट क्षेत्रात सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या पहिल्या दहा शहरांमध्ये जालन्याचा समावेश आहे. पुढील १५ ते २० वर्षांत जालना आणि छत्रपती संभाजीनगर हे ठाणे-मुंबईप्रमाणे जुळे शहर म्हणून विकसित होतील. परिणामी, येथे बांधकाम क्षेत्रासाठी प्रचंड संधी निर्माण होणार असून, अभियंते व बांधकाम व्यावसायिक शहराचा चेहरामोहरा नक्कीच बदलू शकतात.''

✻अभियंत्यांचा सन्मान व कृतज्ञता व्यक्त✻ : बांधकाम क्षेत्राचा अविभाज्य घटक असलेल्या अभियंता बांधवांप्रति कृतज्ञता व्यक्त करत, अभियंता दिनानिमित्त क्रेडाईच्या वतीने जालना शहरातील सर्व अभियंत्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात राजूर गणपती मंदिराचे शिल्पकार इंजि. चंद्रप्रकाश शर्मा, पिसा संघटनेचे अध्यक्ष विनोद यादव तसेच जालना पीपल्स बँकेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल क्रेडाईचे माजी अध्यक्ष संजय मुथा यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभय कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र हुसे यांनी तर आभार सचिव चेतन मराठे यांनी मानले. या चर्चासत्रास क्रेडाईचे उपाध्यक्ष अविनाश भोसले, कोषाध्यक्ष सिद्धांत शर्मा, सहसचिव विष्णू पाटेकर, संचालक केदार जाधव, रितेश मंत्री, शरद बारगजे, वैभव बंब, पिसाचे उपाध्यक्ष मुकुंद बोंद्रे यांच्यासह शहरातील बांधकाम व्यावसायिक व अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिवाणी वादांना...

या खटल्यामध्ये जमीन खरेदी व आर्थिक व्यवहाराच्या पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्यावर भा.दं.वि. कलम ४२०, ४६७ आणि ४६८ अन्वये आठ गुन्हे दाखल करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सखोल तपासणी करत स्पष्ट केले की, संबंधित वाद हा मुळात पैशांची परतफेड व करारांशी संबंधित असून तो पूर्णपणे दिवाणी स्वरूपाचा आहे. अशा दिवाणी दाव्यांमध्ये दबाव आणण्यासाठी किंवा व्यक्तिगत वैमनस्यातून फौजदारी गुन्हे नोंदवणे हा न्यायालयाच्या व कायद्याच्या प्रक्रियेचा उघड दुरुपयोग आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने प्रसिद्ध भजन लाल प्रकरणातील तत्त्वांच्या आधारे अलाहाबाद उच्च न्यायालयाचा आदेश रद्दबातल ठरवून संबंधितांवरील एफआयआर आणि आरोपपत्र थेट रद्द केले. या निकालाचा संदर्भ देत ॲड. महेश धन्नावत म्हणाले की, जालन्यातही सध्या अशाच प्रकारची विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. कायद्याचा गैरवापर करणाऱ्या काही हितसंबंधी घटकांशी संगनमत करून पोलीस यंत्रणा दिवाणी वादांना जाणूनबुजून गुन्हेगारी स्वरूप देण्याचा प्रयत्न करत असल्याचे वारंवार समोर येत आहे. दिवाणी न्यायालयात चालणाऱ्या प्रकरणांमध्ये पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करून नागरिकांना नाहक वेठीस धरणे व दबाव आणणे हे बेकायदेशीर आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनुकूल सिंह, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन तसेच भजन लाल खटल्यांमध्ये स्पष्ट बजावले आहे की, दिवाणी वाद सोडवण्यासाठी किंवा वसुलीसाठी फौजदारी कायद्याचा हत्यार म्हणून वापर करता येत नाही. पोलीस यंत्रणेने स्वतःची मर्यादा ओळखून कायद्याच्या चौकटीतच काम करावे; अन्यथा दिवाणी प्रकरणांत होणाऱ्या या बेकायदेशीर हस्तक्षेपाविरोधात उच्च व सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच नागरिकांनी अशा दबावाला बळी न पडता सजग राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## अन्न सुरक्षा प्रशिक्षण...

व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त निखिल कुलकर्णी म्हणाले की, प्रशासकीय नियम हे अडथळा नसून, तुमचा दर्जा अधिक उंचावणारे कवच आहेत. अन्न व औषध प्रशासनाचा उद्देश कोणावरही विनाकारण कारवाई करणे नसून, उत्तम काम करणाऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हा आहे. कोणत्याही व्यवसायात निकोप स्पर्धा असावी; मात्र त्यासोबतच एक मजबूत आणि संघटित संघटना असणे काळाची गरज आहे. कॅटरिंग व्यावसायिकांचे कौतुक करताना ते म्हणाले की, कोणताही घरगुती कार्यक्रम, विवाह सोहळा असो वा वाढदिवस, यजमानाचा आनंद हा शेवटी जेवणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. पाहुणे जाताना जेवण खूप छान झाले असा अभिप्राय देतात, तेव्हा खरी दाद पडद्यामागे काम करणाऱ्या कॅटररर्सच्या कष्टाला मिळते. हॉटेल व्यावसायिकांकडे हक्काचे स्वयंपाकघर असते, परंतु कॅटरर्सना मात्र प्रतिकूल परिस्थिती, अपुरी जागा आणि वेगवेगळ्या आऊटडोअर ठिकाणी जाऊन काही तासांत दर्जेदार नियोजन करावे लागते; हे निश्चितच कौतुकास्पद आहे. स्वयंपाकासाठी लागणारे किराणा सामान, भाजीपाला आणि फळे घेताना त्याची गुणवत्ता तपासावी. वाढपी व आचारी यांचा पोशाख स्वच्छ असावा, तसेच हातमोजे आणि डोक्यावर कॅप वापरणे ग्राहकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करते.  लग्न समारंभ किंवा मोठ्या महाप्रसादाच्या आयोजनाची माहिती प्रशासनाला आधी असावी, जेणेकरून अन्नाचा संसर्ग किंवा गैरप्रकार टाळता येतील आणि सुरक्षिततेवर देखरेख ठेवता येईल, हा यामागचा मुख्य हेतू आहे.  शंभर टक्के सुरक्षित अन्न देणे ही नैतिक जबाबदारी मानून व्यावसायिकांनी स्वतःमध्ये बदल घडवून आणावा, असे ते म्हणाले.  अन्नसुरक्षा प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षक डॉ. रामेश्वर जाजू यांनी कॅटरिंग व्यावसायिक आणि स्टाफला प्रशिक्षण दिले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी अन्न सुरक्षेच्यादृष्टीने अन्न हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य, स्वयंपाकघर आणि वापरल्या जाणाऱ्या भांडी-उपकरणांचे निर्जंतुकीकरण, स्वच्छता, कच्चे व शिजवलेले अन्न एकमेकांपासून वेगळे ठेवणे, जेणेकरून अन्नाचा संसर्ग टळेल,अन्नाचे योग्य तापमान राखणे, पिण्यासाठी व वापरासाठी शुद्ध पाण्याचा वापर आणि कीटक नियंत्रण यांसारख्या ग्राहकांपर्यंत सुरक्षित व दर्जेदार अन्न पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या शास्त्रीय पद्धती समजावून सांगितल्या.    या प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वीतेसाठी पुरुषोत्तम जयपुरिया, सुमित सारस्वत, गोपाल झंवर, कैलास महाराज शर्मा यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरात बंकटलाल खंडेलवाल, अर्जुन चौधरी, किशोर देशपांडे, दृष्टी लायन्स कॅन्टीन परतूर, अंकित मुथा,  गोविंद मंत्री, मोहन इंगळे, राहुल व्यास, शिवम लाहोटी, प्रवीणकुमार मित्तल, नारायण महाराज गौड, महेश बिटले यांच्यासह राहुल व्यास, वरद मोहता, संजय पैठणकर, अंकित मुथा, प्रवीणकुमार मित्तल, पवन इंगळे, नारायण महाराज गौड, नेमीचंद गौड आदींसह शहरातील कॅटरिंग व्यावसायिक व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

## सेवा संकल्प...

तसेच वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व याबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वनपरिक्षेत्र जालना उत्तर कार्यालयाच्या वतीने कृषी महाविद्यालय, बदनापूर येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना हवामान बदल, मानव-वन्यजीव संघर्ष, वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. बदलते हवामान, घटते वनक्षेत्र आणि मानवी हस्तक्षेप यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम समजावून सांगण्यात आला. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वन विभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले. सेवा संकल्प अभियानानिमित्त वन्यजीव सप्ताहात जालना उत्तर वनपरिक्षेत्राच्या वतीने कन्हैयानगर, जालना येथील उपविभागीय वन अधिकारी व वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. वन अधिकारी व कर्मचारी यांनी परिसराची स्वच्छता करून नागरिकांना स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरणाचा समतोल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या या विविध उपक्रमांमुळे नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण व वन्यजीव संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सुदाम मुंडे यांनी दिली.

# अस्वस्थ बळीराजाची आर्त हाक



'जगाचा पोशिंदा' म्हणून मिरवणारा भारतीय शेतकरी आज अत्यंत अस्वस्थ आहे. ज्याच्या घामातून संपूर्ण देशाची भूक भागते, तो बळीराजा आज स्वतःच्याच अस्तित्वाची आणि आत्मसन्मानाची लढाई लढत आहे. मशागतीपासून ते थेट पीक बाजारात जाईपर्यंतचा त्याचा प्रवास एवढ्या अनिश्चिततेने भरलेला आहे की, शेवटी हतबल होऊन तो आत्महत्येसारखे अत्यंत दुर्दैवी पाऊल उचलत आहे. आजही वर्तमानपत्र उघडले तर निरनिराळ्या भागात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे वृत्त वाचायला मिळते. उन्हातान्हात जमीन तयार करून, चांगल्या बियाण्यांची आणि योग्य किमतीत खतांची वाट पाहण्यापासून शेतकऱ्याचा संघर्ष सुरू होतो. परंतु, बाजारात पाऊल ठेवताच खते आणि बियाण्यांमधील भ्रष्टाचार, काळाबाजार आणि बनावट मालाची फसवणूक त्याला सुरुवातीलाच आर्थिक फटका देते. त्यात भर म्हणून वेळेवर पाऊस पडणे आणि निसर्गाची कृपा राहणे या संपूर्णपणे नशिबाच्या गोष्टी बनल्या आहेत. गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे निसर्गाचे चक्र पूर्णपणे कोलमडले आहे. कधी ओला दुष्काळ, तर कधी कोरडा दुष्काळ अशा निसर्गाच्या अवकृपेमुळे हाता-तोंडाशी आलेला घास एका रात्रीत हिरावून घेतला जातो, ज्यामुळे लागवडीचा खर्चही निघत नाही.

शेतीसाठी भांडवल उभे करताना शासकीय बँकांचे उंबरठे झिजवणे हा शेतकऱ्याच्या आयुष्यातील दुसरा मोठा मनस्ताप आहे. बँक कर्ज वेळेवर मिळणे ही एक अत्यंत क्लिष्ट आणि दिरंगाईची प्रक्रिया झाली आहे. कागदपत्रांची पूर्तता करता करता पिकाचा हंगाम निघून जातो, ज्यामुळे लहान शेतकऱ्यांना नाईलाजाने गावातील खाजगी सावकारांच्या दारात जावे लागते आणि सावकारांचे प्रचंड व्याजदर त्याला कर्जबाजारीपणाच्या खाईत लोटतात. या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी सरकारकडून कर्जमाफीच्या घोषणा केल्या जातात खरे, पण प्रत्यक्षात ती रक्कम मिळायला प्रशासकीय पातळीवर प्रचंड दिरंगाई होते. यात सर्वात मोठा अन्याय नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांवर होतो. त्यांच्यासाठी प्रोत्साहनपर रक्कम जाहीर तर केली जाते, पण ती वेळेवर कधीच मिळत नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये ''नियमित कर्ज भरून काय फायदा?'' अशी भावना निर्माण होते आणि प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्यांमध्ये कर्ज थकवण्याची वृत्ती बळावते.

या अशा बिकट परिस्थितीत पिकांचे नुकसान झाल्यावर शेतकऱ्याला आधार देण्यासाठी पीक विमा ( ) नावाची व्यवस्था उभी केली गेली आहे. परंतु, आज ही व्यवस्थाच शेतकऱ्याच्या अस्वस्थतेचे एक मोठे कारण बनली आहे. पिकांचे अतोनात नुकसान झाल्यावरही विमा कंपन्यांकडून वेळेवर आणि योग्य नुकसानभरपाई मिळत नाही. नुकसानीचे पंचनामे करण्याच्या पद्धती, गुंतागुंतीचे निकष आणि कंपन्यांची टोलवाटोलवी यामुळे शेतकरी पुरता खचून जातो. अनेकदा तर जाचक अटींमुळे प्रत्यक्ष शेतात १०० टक्के नुकसान होऊनही कागदावर मात्र शेतकरी विम्याच्या हक्काच्या रकमेपासून वंचित राहतो. विम्याचा हप्ता भरताना बँक खात्यातून पैसे तात्काळ कापले जातात, पण जेव्हा विम्याची रक्कम मिळण्याची वेळ येते, तेव्हा शेतकऱ्याला विमा कंपन्यांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. ऑनलाईन तक्रार नोंदवण्यातील अडचणी आणि तांत्रिक घोळामुळे हजारो शेतकरी मदतीपासून दूर राहतात. नैसर्गिक आपत्तीने आधीच कंबरडे मोडलेले असताना, विम्याच्या पैशांसाठी करावी लागणारी ही लाचारी शेतकऱ्याला आत्मक्लेश देणारी ठरते.

या सर्व संकटांवर मात करून जेव्हा शेतकऱ्याचा माल कसातरी घरात येतो, तेव्हा खरी लढाई बाजारभावाची सुरू होते. वर्षभर रक्ताचे पाणी करून पिकवलेल्या मालाला बाजारात योग्य किंमत मिळत नाही. मागणी आणि पुरवठ्याचे गणित असे काही फिरवले जाते की, शेतीमाल बाजारात येताच भाव अचानक गडगडतात. दलालांची आणि व्यापाऱ्यांची साखळी शेतकऱ्याचे शोषण करते, ज्यामुळे ग्राहकाला महाग मिळणारी वस्तू शेतकऱ्याकडून कवडीमोल भावाने खरेदी केली जाते. नफा मात्र व्यापारी मंडळीच कमावतात. पिकाला रास्त भाव किंवा किमान आधारभूत किंमत न मिळाल्यामुळे शेतकरी सातत्याने तोट्यात राहतो.

या आर्थिक कोंडीसोबतच शेतकऱ्याला आज सामाजिक पातळीवरही उपेक्षेला सामोरे जावे लागत आहे. शासकीय कार्यालयात किंवा बँकेत काम घेऊन गेल्यावर त्याला सन्मानाची वागणूक मिळत नाही. निवडणुका आल्या की घोषणांचा पाऊस पडतो, पण निवडणुका संपल्या की आश्वासनांची पूर्तता होत नाही. ही सततची आर्थिक ओढाताण, पीक विम्यातील फसवणूक, डोक्यावर साचत जाणारा कर्जाचा डोंगर आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमुळे शेतकरी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचून जातो. जेव्हा त्याला सन्मानाने जगण्याचा कोणताही मार्ग दिसत नाही, तेव्हा तो हतबल होऊन आत्महत्या करतो.बळीराजाची ही अस्वस्थता दूर करायची असेल, तर केवळ तात्पुरत्या घोषणांची मलमपट्टी नको, तर मूळ समस्येवर थेट उपाय करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य आणि शाश्वत हमीभाव मिळालाच पाहिजे. खते आणि बियाण्यांमधील काळाबाजार रोखण्यासाठी कडक कायदे करून दोषींना तात्काळ शिक्षा झाली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पीक विम्याची प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शक आणि सुटसुटीत करून, कोणतीही दिरंगाई न करता विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेवर जमा झाली पाहिजे. विमा कंपन्यांच्या नफेखोरीला चाप लावून त्यांना शेतकऱ्यांप्रती उत्तरदायी बनवले पाहिजे.

बँकिंग व्यवस्थेत सुधारणा करून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ प्रोत्साहनपर लाभ देणे गरजेचे आहे, जेणेकरून प्रामाणिकपणाची कदर होईल. शेतकरी हा केवळ एक मतदार किंवा केवळ अन्न पिकवणारे यंत्र नाही तर तो या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जोपर्यंत आपण त्याला वेळेवर सोयी-सवलती, हक्काचा बाजारभाव आणि समाजात सन्मानाचे जीवन देत नाही, तोपर्यंत ही अस्वस्थता संपणार नाही.



बळीराजाला आत्महत्येपासून रोखायचे असेल, तर संपूर्ण समाजाने आणि सरकारने त्याच्या पाठीशी केवळ आश्वासने देऊन नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून खंबीरपणे उभे राहणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव.**
**८९९९५६६९१७**

# अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ अभिनेत्री संध्या

आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांची आज स्मृतिदिन. अभिनेत्री संध्या यांचे ४ ऑक्टोबर २०२५ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली. अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत. अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. सहकाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते. अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली. त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले. नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट.... या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे. अभिनय सम्राट निळू फुले, डॉ श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली. अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# गांधी जयंतीनिमित्त भास्कर दानवेंचा ई-बसने प्रवास; ड्रायव्हर आणि प्रवाशांशी साधला संवाद!

**जालना - प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन आणि प्रदूषणमुक्त वाहतुकीचा संदेश देण्यासाठी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून भाजप महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी आज जालना ते छत्रपती संभाजीनगर असा ई-बसने प्रवास केला. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याच्या उद्देशाने त्यांनी दर महिन्याला एकदा सार्वजनिक वाहनातून प्रवास करण्याचा संकल्प यावेळी जाहीर केला. प्रवासादरम्यान भास्कर आबा दानवे यांनी ई-बसच्या ड्रायव्हरशी (चालक) विशेष संवाद साधला. ई-बस चालवतानाचा अनुभव, बसचे तंत्रज्ञान, चार्जिंग व्यवस्था आणि



प्रवाशांचा मिळणारा प्रतिसाद याविषयी त्यांनी ड्रायव्हरकडून माहिती जाणून घेतली. तसेच बसमधील सामान्य प्रवाशांशीही संवाद साधून त्यांच्या अडचणी व प्रवासाबाबतच्या प्रतिक्रिया त्यांनी ऐकून घेतल्या. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, ''ई-बसचा वाढता वापर हे स्वच्छ आणि हरित भविष्याच्या दृष्टीने टाकलेले एक सकारात्मक पाऊल आहे. यामुळे इंधनाची बचत तर होतेच, शिवाय वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यास मोठी मदत होते.'' पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक जबाबदारी आहे, असे नमूद करत नागरिकांनीही दैनंदिन आयुष्यात पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

# जिल्ह्यात २३२८७ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्यापही बाकी, तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एकूण तीन टप्प्यांमध्ये एकूण ९३२६८ शेतकऱ्यांचे कर्ज खात्यात एकूण रक्कम ६९८ कोटी ९३ लाख रुपये इतकी रक्कम जमा होऊन त्यांचे कर्जखाते निरंक केले आहेत. तथापि, प्रसिद्ध झालेल्या यादीतील २३२८७ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण होणे अद्याप बाकी आहे. तरी या शेतकऱ्यांनी तातडीने आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे,असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था समृत जाधव यांनी केले आहे.

यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक यांच्या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या माहितीनुसार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व बँकांनी १९०७०१ शेतकऱ्यांची माहिती कर्जमाफी योजनेचे पोर्टलवर अपलोड केली आहे. यापैकी १२६२८६ शेतकऱ्यांची विशिष्ट क्रमांकाची यादी आधार प्रमाणीकरण (-) करण्यासाठी प्रसिद्ध झाली असून १०२९९९ शेतकऱ्यांनी त्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात शासन स्तरावरून ऑनलाइन पद्धतीने रकमा जमा करण्यात आल्या आहेत. दि. १ ऑक्टोंबर पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १९२९ कर्जखात्यांमध्ये ८ कोटी ८४ लक्ष रुपये इतर बँकांच्या १६३९४ कर्जखात्यांमध्ये १७१ कोटी ५९ लक्ष रुपये असे एकूण १८ हजार ३२३ कर्जखात्यांमध्ये एकूण १८० कोटी ४३ रुपये इतकी रक्कम जमा झाली आहे. आतापर्यंत एकूण तीन टप्प्यांमध्ये एकूण ९३२६८ शेतकऱ्यांचे कर्ज खात्यात एकूण रक्कम ६९८ कोटी ९३ लाख रुपये इतकी रक्कम जमा होऊन त्यांचे कर्जखाते निरंक केले आहेत. तथापि, अद्याप २३२८७ शेतकऱ्यांचे आधारप्रमाणीकरण बाकी आहे. ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचे पोर्टलवर प्रसिद्ध झालेल्या यादी जिल्ह्यातील सर्व बँकशाखा/विका संस्था/आपले सरकार सेवा () केंद्र/ग्रामपंचायत/तलाठी कार्यालय/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सेवा केंद्रात त्यांचे आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे. प्रसिद्ध झालेल्या यादीतील २३२८७ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण होणे अद्याप बाकी आहे.

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपले सरकार केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण (-) तातडीने करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत करण्यात येत आहे. आधार प्रमाणीकरण करण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी यादीमध्ये नाव समाविष्ट असल्याची खात्री करून ॲप्लीकेशन क्रमांक, मूळ आधारकार्ड व बचत खात्याचे पासबुक घेऊन समक्ष आपले सरकार सेवा () केंद्रावर जाऊन तातडीने आधार प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर व उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयांशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# घनसावंगी मतदारसंघातील दुष्काळसदृश परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करा

## आमदार हिकमत उढाण यांचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदन

**घनसावंगी – प्रतिनिधी**

घनसांवगी विधानसभा मतदारसंघातील दुष्काळसदृश परिस्थिती, वाढती पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले मोठे नुकसान लक्षात घेऊन आमदार हिकमत दादा उढाण यांनी राज्याचे महसूल मंत्री ना. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भेट घेऊन शेतकरी व ग्रामीण जनतेच्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी पीकविम्यासाठी प्रत्यक्ष मानवी पंचनामे ग्राह्य धरून सन २०२४ व २०२५ मधील प्रलंबित पीकविमा दावे तातडीने निकाली काढावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच प्रलंबित कर्जमाफीची रक्कम तातडीने वितरित करून शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे आणि कर्जासाठीची अट रद्द करावी, अशी मागणीही करण्यात आली.



दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतकऱ्यांना ₹५० हजार, बागायती शेतकऱ्यांना ₹१ लाख आणि पात्र भूमिहीन शेतमजुरांना ₹२५ हजार विशेष अनुदान देण्यात यावे, अशी मागणी आमदार उढाण यांनी केली.

घनसावंगी, जालना व अंबड तालुक्यात मंडळनिहाय चारा छावण्या सुरू कराव्यात, मोसंबी व इतर फळबागांसाठी स्वतंत्र टँकरची व्यवस्था करावी तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांची वाड्या-वस्त्यांची गावनिहाय मागणी व प्राथमिक आढावा तयार करून तातडीने पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच जलजीवन मिशनची अपूर्ण कामे पूर्ण करणे, मनरेगा/ची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करणे, प्रलंबित मजुरी अदा करणे, दुष्काळी परिस्थितीत वीज बिल वसुलीस स्थगिती देऊन वीज तोडणी थांबवणे व लोडशेडिंग बंद करणे, शेतातील वस्त्यांवरील शेतकऱ्यांना सिंगल फेज वीज उपलब्ध करून देणे, या मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या.

दुष्काळ निवारणाच्या कामांना आचारसंहितेचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत, रेशन दुकानांवर पुरेसा धान्यसाठा उपलब्ध करावा, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क व शैक्षणिक फी माफ करावी, पाणीपट्टी, शेतसारा व इतर शासकीय करांमध्ये सवलत द्यावी तसेच कालवे व वितरिकांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणीही आमदार उढाण यांनी केली. संकटात सापडलेल्या बळीराजाला आणि ग्रामीण जनतेला तातडीने दिलासा मिळणे आवश्यक असून, शासनाने या सर्व मागण्यांवर सकारात्मक व त्वरित निर्णय घ्यावा, अशी आग्रही भूमिका आमदार हिकमत दादा उढाण यांनी महसूलमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यासमोर मांडली.

# वाई येथे सर्पदंशाने बैलाचा मृत्यू; शेतकऱ्याचे ७० हजारांचे नुकसान

**जालना - प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील वाई येथे शेतकरी भगवान रावसाहेब उबाळे गट नंबर २२५ या शेतामध्ये नेहमीप्रमाणे बैल बांधलेले असतात मात्र दिनांक २/१०/२०२६ रोजी अचानक एक बैल सर्प दंशाने मृत्यू पावला. शेती कष्टाची आणि जिव्हाळ्याची गोष्ट असते,पण निसर्गाच्या एका फटक्याने शेतकऱ्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो. अशीच एक दुर्दैवी घटना वाई परिसरात घडली आहे. वाई येथील शेतकरी भगवान रावसाहेब उबाळे यांच्या गोठ्यासमोर बांधलेल्या बैलाला एका विषारी सापाने दंश केला.

सर्पदंश झाल्याचे लक्षात येताच बैलाची प्रकृती झपाट्याने खालावली. पशुवैद्यकीय डॉक्टरांना बोलावून उपचार सुरू करण्यापूर्वीच बैलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे अंदाजे ७० हजार रुपयांचे थेट आर्थिक नुकसान झाले आहे. ऐन शेतीच्या हंगामात कामाचा मुख्य सोबती दगावल्याने उबाले कुटुंबावर मोठे संकट आले असून, शासनाने तात्काळ पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

# गांधी-आंबेडकरांतील मतभेद समजून घेणे आवश्यक - डॉ. सुधीर गव्हाणे

## सर्वोदय मंडळ तर्फे गांधी जयंती निमित्त व्याख्यान




**जालना - प्रतिनिधी**

गांधी-आंबेडकर यांच्यातील मतभेद केवळ संघर्ष म्हणून न पाहता त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि जातीय वास्तवाच्या संदर्भात समजून घेतले पाहिजेत असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले. शहरातील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात सर्वोदय मंडळ यांच्या वतीने शुक्रवारी (ता.२) व्याख्यान आयोजित गांधी-आंबेडकर विचार : समकालीन वास्तव आणि ऐक्याचा विचार, या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी प्रसिद्ध व्याख्याते डॉ. जयदेव डोळे, विधिज्ञ शिवाजीराव आदमाने, प्रा. सत्संग मुंढे, विशाल तौर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. गव्हाणे म्हणाले की, गांधी -आंबेडकर यांच्यातील मतभेदांचा संदर्भ देताना म्हणाले, डॉ. आंबेडकर निर्भीडपणे आपले मत मांडणारे विद्वान होते. त्यांच्या विद्वत्तेचा गौरव करणारे अनेक उल्लेख गांधींच्या लिखाणात आढळतात. गांधी-आंबेडकर यांच्यातील मतभेद केवळ संघर्ष म्हणून न पाहता त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि जातीय वास्तवाच्या संदर्भात समजून घेतले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. गांधी आणि आंबेडकर यांच्या भेटीनंतर हरिजन नियतकालिक सुरू झाले आणि त्यात आंबेडकरांचे लेखही प्रसिद्ध झाले. जातिव्यवस्था आणि दलितांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न या दोन्ही नेत्यांच्या सार्वजनिक विचार मंथनाच्या केंद्रस्थानी होता. स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीवरून गांधी-आंबेडकर यांच्यात तीव्र मतभेद झाले. मात्र, या वादाचा संपूर्ण संदर्भ अनेकदा सांगितला जात नाही, असे डॉ. गव्हाणे यांनी नमूद केले.महात्मा गांधी हे जातिभेद आणि अस्पृश्यतेच्या विरोधात भूमिका घेणारे नेते होते. डॉ. आंबेडकरांची भूमिका अधिक मूलगामी होती. दोघांच्या मार्गांमध्ये फरक असला तरी सामाजिक विषमतेविरोधातील त्यांच्या चितेचा व्यापक संदर्भ समजून घेणे गरजेचे आहे, असेही डॉ. गव्हाणे यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाला सर्वोदय मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### गांधी-आंबेडकरांच्या विचारांचा तपास घेण्याआधी मन स्वच्छ करा

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांबाबत समाजमाध्यमे आणि व्हॉट्सप युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून अनेक चुकीचे आणि विकृत विचार पेरले गेले आहेत. त्यामुळे या दोन महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा धांडोळा घेण्यापूर्वी आपली मने स्वच्छ केली पाहिजेत. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात १९२१ पासून संवाद होता. गांधींनी आंबेडकरांविषयी वाईट बोलल्याचे कुठेही आढळत नाही. गांधींची हत्या झाल्यानंतर मधुमेहाचा त्रास असतानाही डॉ. आंबेडकर त्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. मात्र, या दोन्ही महापुरुषांच्या विचारांबाबत अनेकदा चुकीचे आणि विकृत चित्र समाजासमोर मांडले गेले. गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेलाही संविधानाच्या चर्चेत स्थान मिळाले. त्यामुळे दोन्ही महापुरुषांच्या विचारांचे मूल्यमापन करताना पूर्वग्रह बाजूला ठेवणे आवश्यक आहे, असे डॉ. डोळे यांनी स्पष्ट केले. राहुल गांधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरोधात स्पष्ट भूमिका मांडतात; मात्र काँग्रेसमधील इतर नेते तितक्या स्पष्टपणे भूमिका घेताना दिसत नाहीत, असेही त्यांनी नमूद केले. फुले, शाहू, आंबेडकर आणि पेरियार यांच्या विचारांना विषारी का म्हटले जाते, याबाबत विद्यापीठांमध्ये चौकशी करण्याच्या संदर्भातील चर्चेचाही त्यांनी उल्लेख केला.




भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली, यावेळी देविदास देशमुख, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, सुदर्शन काळे, राधकीसन काटे, विठ्ठल नरवडे, करण तळेकर आदींची उपस्थिती होती.

# सौ. कविता धनंजय पाटील यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिका प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा, नूतन वसाहत , जालना येथे शिक्षिका सौ. कविता धनंजय पाटील यांचा सेवापूर्ती सोहळा अत्यंत भावूक आणि उत्साही वातावरणात पार पडला.



या निवृत्ती सत्कार व सेवापूर्ती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नूतन वसाहत शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेश मुंडलिक हे उपस्थित होते. याप्रसंगी सकाळ वर्तमानपत्राचे डेप्युटी मॅनेजर प्रतिनिधी श्री. गोपाल बुट्टे, श्री डॉ. प्रकाश मांटे शिक्षणाधिकारी मनपा जालना, माजी शिक्षणाधिकारी श्री. इर्शाद सर, माजी शिक्षणाधिकारी श्री. शहा फैसल, मनपा रंगार खिडकी शाळेचे मुख्याध्यापक श्री. अंकुश दगडखैर, तसेच सरस्वती भवन जालनाचे माजी मुख्याध्यापक श्री. धनंजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांनी सौ. कविता पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या प्रदीर्घ आणि समर्पित योगदानाचा गौरव केला. आपल्या सेवाकाळात त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यावर उत्तम संस्कार घडवले, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते सौ. पाटील यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला आणि पुढील भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

या सोहळ्यास श्री. आनंद मस्के, श्री. विवेक भालके, श्रीमती रेखा चाबुकस्वार, श्रीमती विजय आडे, श्रीमती जयश्री बुट्टे मॅडम, रामेश्वरी वखारे, दिपाली मस्के आणि किरण पवार यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार श्रीमती रेखा चाबुकस्वार यांनी मानुन सोहळ्याची सांगता झाली.

# भालचंद्र देशपांडे यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**

: जुना जालना भागातील वृंदावन कॉलनीतील रहिवासी भालचंद्र रामचंद्र देशपांडे (वय ८८) यांचे शुक्रवारी निधन झाले.



त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. भालचंद्र देशपांडे यांच्या पार्थिवावर रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. नेत्रदानासाठी समाजसेवक अभय करवा तसेच मैत्र मांदियाळी ग्रुपच्या सदस्यांनी मदत केली.

# जिल्हाधिकारी बांधावर ;पीक पाहणी करुन शेतकऱ्यांशी साधला संवाद

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. जिल्हाधिकारी गौडा यांनी आज दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी माळीवाडा ता.छत्रपती संभाजीनगर, सराई ता.खुलताबाद, वारेगाव ता.फुलंब्री, चौका ता. छत्रपती संभाजीनगर या परिसराचा पाहणी दौरा केला . पिकांच्या स्थितीचे अवलोकन करुन त्यांनी यावेळी शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.

याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तहसीलदार शिवानंद बिडवे तालुका कृषी अधिकारी छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, फुलंब्री व अन्य अधिकारी कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गौडा शेतकऱ्यांशी संवाद साधतांना म्हणाले की, शेतकऱ्यांनी सकारात्मक राहून पंचनामे करण्याकामी शासकीय यंत्रणेला सहकार्य करावे. शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे. कुठल्याही पात्र शेतकऱ्याला लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही. याची खात्री मी स्वतः करणार आहे.

पिण्याच्या पाण्याचे साठ्यांमधील अनधिकृत पाणी उपसा बंद करून पिण्याचे पाणी संरक्षित केले जाईल आणि संबंधित यंत्रणेला योग्य ते आदेश दिले जातील असेही जिल्हाधिकारी गौडा यांनी आश्वासित केले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाणी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा छावण्यांची आवश्यकता तसेच रोजगाराच्या उपलब्धतेबाबतही आढावा घेण्यात आला. पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषांनुसार मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पिकांची सद्यस्थिती, उत्पादनातील संभाव्य घट आणि शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या तातडीच्या उपाययोजनांचे मूल्यांकन करून संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, तसेच पाणी बचत, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी पिकांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे निर्देश देण्यात आले.

# गुरु-शिष्य परिवाराच्या आदर्श शिक्षकांसह विविध पुरस्कारांचे आज वितरण

**जालना - प्रतिनिधी**

गुरु-शिष्य परिवाराच्या वतीने दरवर्षीप्रमाणे प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचा वितरण सोहळा ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शहरातील आनंद मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यात आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श शाळा पुरस्कार, आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार, आदर्श माध्यमिक शिक्षक पुरस्कार तसेच मरणोत्तर गुरु-शिष्य पुरस्कार यांसह विविध पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

जालना जिल्ह्यातील १७ प्राथमिक शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार', तर इतर विविध क्षेत्रांतील ८ पुरस्कार प्रदान करून मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यास शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच गुरु-शिष्य परिवाराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती गुरु-शिष्य परिवाराचे अध्यक्ष श्री. के. के. खंडाळे सर आणि सचिव श्री. योगेश मोरे यांनी दिली.

# अ.भा. लोकहित महासंघाच्या वतीने महात्मा गांधी यांना अभिवादन

**जालना - प्रतिनीधी**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे प्रणेते, अहिंसक आंदोलनातुन ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडणारे महात्मा गांधी यांना अखिल भारतीय लोकहित महासंघाच्यावतीने त्यांच्या जयंती निमीत्त चमन याठिकाणी असलेल्या त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले.



यावेळी महासंघाचे अध्यक्ष शेख चाँद पी.जे., कार्याध्यक्ष वसीम खान, जालना तालुका युवक आघाडी अध्यक्ष गणेश कातकाडे, जालना शहर अध्यक्ष युवक आघाडी ईम्रान खान, नितीन जाधव यांची उपस्थिती होती.

# एसआरपीएफच्या वतीने नागरिकांसाठी २४ तास शुद्ध व थंड पाणी उपलब्ध

## एसआरपीएफच्या वतीने नागरिकांसाठी २४ तास शुद्ध व थंड पाण्याची सुविधा

**जालना - प्रतिनिधी**

राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ३, जालना यांच्या आस्थापनेवर पोलीस कल्याण उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी एसआरपीएफ ३०० क्वार्टर येथील हनुमान मंदिर गेटसमोर, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ३ येथे 'तृष्णा वॉटर प्लांट एटीएम'च्या माध्यमातून शुद्ध व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. नागरिकांना २४ तास या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ३ चे समादेशक संजयकुमार बारकुंड यांच्या संकल्पनेतून नागरिकांच्या सेवेसाठी ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. या वॉटर एटीएममधून भारतीय मानक संस्था (बीआयएस)च्या



निर्धारित मानकांनुसार शुद्ध केलेले पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. या पाण्यामध्ये ऊए ५०० मिलीग्रॅम, पीएच मूल्य ६.५ ते ८.५, कॅल्शियम ७५ मिलीग्रॅम, मॅग्नेशियम ३० मिलीग्रॅम, क्लोराईड २५० मिलीग्रॅम, सल्फेट २०० मिलीग्रॅम, आयर्न १ मिलीग्रॅम आणि फ्लोराइड १ मिलीग्रॅम इतके प्रमाण ठेवण्यात आले आहे. नागरिकांना माफक दरात पाणी उपलब्ध करून देण्यात आले असून १ लिटर पाण्यासाठी २ रुपये, ४ लिटरसाठी ५ रुपये, ८ लिटरसाठी ८ रुपये आणि १५ लिटरसाठी १५ रुपये असे दर निश्चित करण्यात आले आहेत. जालना शहरातील नागरिकांना विशेषतः परिसरातील नागरिकांना या सुविधेचा २४ तास लाभ घेता येणार आहे. नागरिकांनी या शुद्ध व थंड पाण्याच्या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन एसआरपीएफ गट क्रमांक ३, जालना यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जालना लायन्स क्लबतर्फे गांधी जयंतीनिमित्त ग्राहकांना कापडी पिशव्यांचे मोफत वाटप

## प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून दहा हजार कापडी पिशव्या वाटपाचा संकल्प

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त लायन्स क्लब ऑफ जालनाच्या वतीने एक कदम स्वच्छता की ओर या संकल्पनेतून प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांना क्लबच्यावतीने स्वतः तयार केलेल्या सुती कापडाच्या पिशव्या मोफत वाटप करण्यात आल्या.



प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे पर्यावरणास मोठ्या प्रमाणात हानी होत असून, त्याचा परिणाम माती, पाणी, पशुपक्षी तसेच मानवी जीवनावरही होत आहे. प्लास्टिकचा वापर कमी करून त्याऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या कापडी पिशव्यांचा वापर करावा, असा संदेश यावेळी ग्राहकांना देण्यात आला. या उपक्रमांतर्गत एकूण १० हजार कापडी पिशव्या नागरिकांना वाटप करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

केवळ पिशव्या वाटप करण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता, प्रत्येक ग्राहकाला प्लास्टिक पिशवी न वापरण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

या उपक्रमात लायन्स क्लब ऑफ जालनाचे अध्यक्ष डॉ. गिरीश पाकणीकर, सचिव गणेश कामड तसेच सदस्य द्वारकादास मुंडडा यांनी सहभागी होत ग्राहकांशी संवाद साधला. ग्राहकांना कापडी पिशवी देतानाच प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले. क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन केलेल्या या जनजागृतीमुळे नागरिकांमध्येही पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक संदेश पोहोचला. महात्मा गांधी यांनी स्वच्छता, साधेपणा आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश दिला. त्याच विचारांना कृतीची जोड देत स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात करावी, असे आवाहन लायन्स क्लब ऑफ जालनाच्यावतीने करण्यात आले.आज एक कापडी पिशवी वापरणे म्हणजे उद्याच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या दिशेने एक छोटा पण महत्त्वाचा टप्पा आहे,'' असा संदेश देत हा उपक्रम राबविण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.